# ‘बायफोकल’

## 11वी करीता सुवर्णसंधी

महाराष्ट्र शासनाने मागील काही वर्षांपासून मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या प्रमुख शहरांमधे इ. 11वी करीता 100% ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबविण्याचे धोरण पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे सुरू ठेवले आहे. तसेच 11वी सायन्स् व कॉमर्सकडे उपलब्ध व्यवसाय अभ्यासक्रमाकडील विषयांकरीता महाविद्यालय स्तरावर समांतर प्रवेशप्रक्रिया करण्याचे नियोजन केलेले आहे. या व्यवसाय अभ्यासक्रमांना द्विलक्ष्यी अथवा बायफोकल असे संबोधले जाते. या विषयांना विद्यार्थी व पालकांची प्रचंड मागणी असते. त्यामुळे या विषयाची प्रवेशप्रक्रिया मेरीटनुसार तसेच आरक्षणाचे सर्व नियम लावून महाविद्यालय स्तरावर राबविली जाते.

ज्या विद्यार्थ्यांना 12वी नंतर इंजिनियरींग अथवा आय्.आय्.टी. अशा उच्च शिक्षणाकडे जाण्याचे ध्येय आहे त्यांना 200 गुणांचा बायफोकल विषयांचा फायदा होणार आहे. यामधे 100 गुणांचा प्रात्यक्षिक विषय असल्याने स्कोअरींग करणे इतर भाषा विषयांपेक्षा सोपे जाते. तसेच इंजिनियरींग प्रवेशाकरीता पी.सी.एम्. मधे 50% गुणांची आवश्यकता असते. त्यामधे जर हे गुण 50% पेक्षा कमी येत असतील तर केमिस्ट्री या विषयाच्या गुणांऐवजी बायफोकल विषयाचे मार्क्स् उपयोगी पडतात. बायफोकल प्रवेशप्रक्रियेमधे सर्व प्रवेश आरक्षणाच्या नियमानुसार त्यामधे 25% जागा 10वी मधे टेक्निकल विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना राखीव असतात. आय्.आय्.टी. ध्येय असलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाकरीता इ. 12वी प्रवेशाच्या एकूण 75% गुणांची अट असते. त्यामध्येही बायफोकल विषयाचा फायदा होतो. त्यामुळे आय्.आय्.टी. प्रवेश सोपा होतो.

### पुणे व पिंपरी -चिंचवड शहरातील बायफोकलमधील विषय

महाराष्ट्र शासनाने कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसार 1978 पासून इ.11वी व 12वी या +2 स्तरावर व्दिलक्ष्यी व्यवसाय अभ्यासक्रमातील विषय विशेषत: सायन्स व कॉमर्स या शाखेकडे 200 गुणांचे म्हणजे एकूण गुणांच्या 33% व्याप्ती ठेवून सुरू ठेवलेले आहेत. हे अभ्यासक्रम सध्याच्या स्कील डेव्हलपमेंटप्रमाणे आहेत. सायन्स शाखेकडे विशेषत: अभियांत्रिकीकडे अथवा आय.आय.टीकडे कल असलेले विदयार्थ्यांना या बायफोकल विषयांचा विशेष फायदा होतो.

सायन्स शाखेकडे बायफोकलचे उपलब्ध विषय

1) इलेट्रॉनिस
2) कॉम्प्युटर सायन्स

याविषयांची प्रवेशसंख्या मर्यादित असलेने विदयार्थी व पालकांनी ऑनलाईन प्रवेशाच्या वेबसाईटवरती महाविद्यालयानुसार प्रवेशसंख्या व इतर माहिती पहाणे आवश्यक आहे.

व्दिलक्ष्यी व्यवसाय अभ्यासक्रम विषय हे सायन्स शाखेकडे दोन लक्ष्य ठेवून सुरू केलेले असल्याने व्दिलक्ष्यी अथवा बायफोकल या नावाने ओळखले जातात ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, ऑर्किटेचर, आयआयटी, शेतकी इ. क्षेत्रात करियर करायचे ध्येय आहे ते विद्यार्थी हे बायफोकलचे विषय प्राधान्याने निवडतात ज्यामुळे अभियांत्रिकी प्राथमिक तयारी 2 स्तरावरच पायासहीत भक्कम होते व्दिलक्ष्यीचे विषय हे व्यवसायभिमुख असल्याने विदयार्थी फिजीक्स्, केमिस्ट्री व मॅथेमॅटिक्स् याबरोबरीने विशेष आवडीने व प्रशिक्षण घेतात. जे विद्यार्थी सुरवातीपासूनच म्हणजे 8वी पासूनच उच्चतंत्र अथवा आयआयटी इंजिनिअरींगकडे जाण्याचे ठरवितात त्यांना या विषयांचा विशेष उपयोग होत असलेने व्दिलक्ष्यी विषयांना इ. 11वी व 12वी सायन्सकडे प्रचंड मागणी आहे याबरोबरच व्दिलक्ष्यी विषयांचा सी.ई.टी. जे.ई.ई. नाटा यासांरख्या परीक्षेच्या तयारीकरिता उपयोग होतो.

इ.11 सायन्सकडे एकूण सहा विषय प्रामुख्याने घ्यावे लागतात. बायफोकलमधील एक विषय 200 गुणांच्या असलेने नेहमीच्या दोन विषयांऐवजी एक व्दिलक्ष्यी विषय घेता येतो. उदा. व्दितीय भाषा (100 गुण) व जीवशास्त्र (100 गुण)च्या ऐवजी व्दिलक्ष्यी विषयाकडील 200 गुणांचा इलेट्रॉनिस, कॉम्पुटर सायन्स, एसएमएस यापैकी एक विषय घेता येतो. इ.11वी मधे प्रवेश घेताना खालीलप्रमाणे सहा विषय विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील उपलब्धतेनुसार घेता येतील.

1) इंग्रजी 2) व्दितीय भाषा ऐवजी व्दिलक्ष्यी पेपर 1 3) फिजिस
4) केमिस्ट्री 5) मॅथेमॅटिस 6) बायोलॉजी ऐवजी व्दिलक्ष्यी पेपर 2

हा सहा विषयांचा पॅटर्न बायफोकलमधील विषय घेऊन 12वी सायन्स पूर्ण केल्यास विदर्यार्थ्यांना पुढील फायदे होऊ शकतात.

1. इ. 12वी किंवा सी.ई.टी.मध्ये कमी गुण मिळाल्यास डिप्लोमाच्या दुसऱ्या वर्षाकरिता थेट प्रवेश. याकरिता पात्र बायफोकल विषयांची यादी पहाणे आवश्यक आहे.

2. कोणत्याही इंजिनिअरिंग शाखेकरिता पात्र उदा. बायफोकल इलेट्रॉनिस् घेतलेल्या विद्यार्थ्यास कॉम्प्युटर सायन्स, सिव्हिल, मेकॅनिकल इ. विषयांकडे प्रवेश घेता येतो.

3. आर्किटेचर पदवीकरिता प्रवेशास एकूण गुणांचा समावेश असल्याने व्दिलक्ष्यीचा फायदा होतो

4. बी.एस.सी. अथवा बी.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स प्रवेशास पात्र.

5. बी.सी.ए., बी.बी.ए. इ. अभ्यासक्रमास पात्र

6. आय.आय.टी.करता 12वीच्या एकूण गुणांची अर्हता मिळविणासाठी बायफोकलचा उपयोग होतो.

8. फार्मसी पदविका / पदवीकरिता प्रवेशास पात्र.

9. बी.टेक. कृषी पदवीकरिता प्रवेशास पात्र.

10. बायफोकल अभ्यासक्रमामधील विषय हे 200 गुणांची असून थिअरी 100 व प्रॅटिकल 100 गुणांचे असलेने 12वी मध्ये अधिक गुण मिळविणे शय होते. तसेच व्दितीय भाषा आणि जीवशास्त्र या विषयास पर्याय उपयुत ठरतो. बायफोकल विषयाकरिता ११वी ऑनलाईन फॉर्म - पार्ट १ मध्ये बायफोकल ऑप्शन समोर "होय' असे करावयाचे आहे. अनावधानाने "होय' करायचे राहिल्यास महाविद्यालय स्तरावर बायफोकल विषय घेता येतो.

इ. ११वी मध्ये बायफोकल विषय निवडणे ही एका सुवर्णसंधी आहे. इ. १२वी मध्ये बायफोकल विषय थेट घेता येत नाही.